# सहकार पंढरी सावदा

प्रकाशित:

**०१. दैनिक सकाळ मुक्तपीठ**

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

**© पुनरारंभ**

**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# सहकार पंढरी सावदा

जळगाव जिल्हयात जळगाव रावेर मार्गावर जळगाव पासून सुमारे ६0 कि.मी. अंतरावर वसलेले सावदा शहर. शहराची लोकसंख्या साधारण २५ ते ३0 हजारापर्यंत. तेथे क वर्गाची नगरपालिका असल्याने आवश्यक अशा सर्व सुख सोयींनी पुरेसे असलेले छोटेसे व सुंदर शहर. सावदा शहर एस.टी.ने तसेच रेल्वे मार्गाने पण जोडले गेले आहे. सावदा रेल्वे स्टेशन शहरापासून साधारण ७ कि.मी. अंतरावर आहे. या शहराचे वैशिष्टय म्हणजे येथून जवळच असलेल्या रावेर व निंभोरा रेल्वे स्टेशन प्रमाणे येथूनही खान्देश प्रसिध्द केळीचा व्यापार चालतो. रेल्वेच्या वॅगन्स (वाघिणी) भरभरून केळी देशभर रवाना होतात. या कारणास्तव या शहराला नुकतेच बनाना सिटी या नावाने विभुषित करणेत आले आहे. या शहराबद्दल अजून सांगायचे झाले तर येथून जवळच ५ कि.मी.अंतरावर फैजपूर हे जुने छोटेसे शहर आहे. येथे साथारण १९३६ साली कॉंग्रेसचे महाअधिवेशन संपन्न झाले होते. यावेळी येथे तत्कालीन कॉंग्रेसच्या महादिग्गज नेत्यांनी हजेरी लावली होती म्हणुन या शहाराची सावदा–फैजपूर अशी जोड करून ओळख दिली जाते.

एस.टी.ने सावदा बस स्थानकावर उतरल्यावर शहराच्या भव्य स्वागत पर कमानी जवळच केळीचे झाड व त्यासोबत एका शेतकरी कुटुंबाचा आकर्षक पुतळा आपले मन आकर्षून घेतो. उजव्या बाजूस सुंदरसे दुर्गा मातेचे मंदिर आहे. शहरात येणारा व जाणारा प्रत्येक भाविक या मातेस नतमस्तक होऊनच आपल्या मार्गाला लागतो. व्यावसायिक दृष्टया शहरात चांगली बाजारपेठ व कृषिउत्पन्न बाजार समितीचे मोठे मार्केट असल्यामुळे ग्राहक व व्यापारी वर्ग सदैव आनंदी आहे.

अशा या सुख संपन्न शहरात नुकताच जाण्याचा योग आला. संध्याकाळी तेथील स्थानिक व जवळचे नातेवाईक श्री. अभय व अभिजित नंदऋषि यांचे समवेत शहराचे मध्यावर्ती ठिकाणी आडाजवळ (हाळाजवळ) श्री विठ्ठल मंदिरात चालू असलेल्या ज्ञानेश्वरी भागवत सप्ताह ठिकाणी दर्शनास गेलो असता समोर भागवत सप्ताहाच्या सांगता समारोपाची तयारी जोरात चालू

असलेली दिसली. ते अविस्मरणीय भक्तिभावात्मक दृश्य पाहून न भुतो न भविष्यती असा मनस्वी आनंद झाला व हरीपाठातील ओवी आठवल्या.

साधुबोध झाला तो नुरोनिया ठेला.
ठायीच मुराला अनुभव
कापुराच्या वाती उजळल्या ज्योती
ठायीच समाप्ती झाली जैसी
मोक्षरेखे आला भाग्ये विनटला
साथुचा अंकिला हरिभक्त
ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनी
हरि दिसे जनी वनी आत्मतत्वी

खरोखरीच काय ते अविस्मरमणीय दृश्य. साधू संतांची शिकवण वेगळी नाही. जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा. ईश्वर वेगळा असा कोठे नाही तो सर्वव्यापी जळी स्थळी काष्ठी पाषाणी आहे. एवढेच नव्हे तर तो तुमच्या आमच्यात जनसामान्यात सामावलेला आहे. अशा जनसामान्यांस हरि समजून हरिभक्त होउन हरिभक्तीचा आनंद घेण्यात तेथील लहान थोर आबाल वृध्द सर्व कामात जुटले होते. कापराची वात ज्या प्रमाणे आपले अस्तित्व न ठेवता देवासमोर जळते त्याप्रमाणे जो तो देहभान हरवून आपले अस्तित्व विसरून आपल्या कामात मग्न होता. कळत न कळत मी पण त्यामध्ये हरवून गेलो.

उद्या सप्ताहाचा शेवटचा दिवस. सकाळी काल्याचे किर्तन संपल्यावर सर्व शहरवासियांना वरण बट्टी व खान्देश प्रसिध्द वांग्याची भाजी असा अनोखा चविष्ट महाप्रसाद दिला जातोया महा प्रसादाची येथे तयारी चालू होती. येथे कोणालाही आमंत्रण नाही, मानपान नाही, अथवा आग्रह नाही. जो तो स्वयं स्फूर्तीने स्वतःस या कामामध्ये तन मन धनाने वाहून घेतो व महाप्रसादाचा लाभ घेतो.

येथे बट्टी बनविण्याचा प्रकार फार मजेशीर व आनंददायक वाटला. सुमारे २१ क्विंटल गव्हाचे पीठ दळण्यात आले होते. या सर्व बट्टया शेकडो हातांनी केवळ तीन ते चार तासात बनविल्या. रस्त्याच्या मध्यभागी एका टोकापासून दुस-या टोकापर्यंत शेण्या(शेणाची गौरी) तसेच तुरीच्या वाळलेल्या झाडांच्या फांद्या (तूरखाटया) व कापसाच्या झाडाच्या वाळलेल्या फांद्या (पयखाटया) यांचा निखारा पेटविला होता. निखा-याच्या दोहो बाजूस अनेक जण रांगेत बसून काम करित होते. काही जण पीठ मळण्याचे व मळलेल्या पीठाचे जाडसर रोडगे अर्थात बट्टी तयार करण्याचे तर काही ते रोडगे निखा-यावर भाजण्याचे काम करित होते. नंतर रस्त्याच्या कडेला कोप-यात साधारण ८ बाय ४ बाय ६ फूट खोल आकाराचा चौरस खड्डा करून यामध्ये सर्व भाजलेले रोडगे आणून टाकले जात होते. तळाशी पहिला निखा-याच्या गरम राखेचा थर त्यावर भाजलेल्या रोडग्यांचा एक थर त्यावर परत गरम राख. असे रोडगे व गरम राख याचे थरावर थर रचले जात होते. सरते शेवटी सर्व खड्डा हलक्या मातीच्या थराने बुजविला गेला. हे सर्व काम एकमेकाच्या सहकार्याने व जलद गतीने कोणासही शारिरीक इजा होणार नाही याची दक्षता घेत शांततेने चालले होते.

हे राडगे दुसरे दिवशी दुपारी जेवणाचे वेळेस बाहेर काढून लहान मोठे तुकडे करून वाढण्यात येणार होते. तो पर्यंत सर्व रोडगे गरम राखेच्या आहारावर भाजले जातील. एकीकडे रोडगे बनविण्याचे तर दुसरीकडे वरण शिजविणे भाजी चिरणे इ. कामे उत्साहात चालू होती. सर्व स्वयंपाकाचे काम संध्याकाळी ७ चे सुमारास सुरू होते व पहाटे तीन वाजेपर्यंत चालते.

दरम्यान तेथील उपस्थितांपैकी शहरातील एक प्रतिष्ठित व्यक्ति सावदा नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष श्री.राजेंद्र श्रीकांत चौधरी वार्तालापासाठी उपलब्ध झाले. त्यांचेशी झालेल्या मनमुराद गप्पा मारतांना या संदर्भात अनेक गोष्टी ज्ञात झाल्या. हे भागवत हरिनाम सप्ताहाचे २६वे वर्ष आहे. दरवर्षी मराठी माघ महिन्यात श्री विठ्ठल मंदिर न्यास (ट्रस्ट) तर्फे या समारोहाचे आयोजन करण्यात येते. सुरवातीचे काही वर्षे या सप्ताहाचे स्वरूप फार छोटया प्रमाणात होते. पुढे पुढे ते चंद्रकले प्रमाणे वाढत गेले व आज अशा भव्य स्वरूपात साजर केले जात आहे. चुलीवर नुसते भाताचे भांडे ठेउन भात शिजत नाही त्याला खालून उर्जा शक्ति द्यावी लागते तरच चविष्ट भात

खावयास मिळतो. तद्वत या सोहळया मागचे प्रेरणा स्त्रोत येथील एक ज्येष्ठ हरिभक्त श्री.जगन्नाथ महाराज आहेत. यांच्या प्रेरणेने या सप्ताहास सुरवात झाली. विशेष म्हणजे त्यांचे आजचे वय ९१ वर्षे असून देखिल ते आज पण दरवर्षी न चुकता आषाढ महिन्यात पंढरीची वारी उत्साहाने करतात शिवाय त्यांना शासनातर्फे नुकताच विशेष पुरस्कार जाहिर झाल्याचे समजते. दरवर्षीचे हरिनाम सप्ताहाची सांगता श्री.जगन्नाथ महाराज यांचे काल्याचे किर्तनाने केली जाते. महाप्रसादाचे जेवणाची सुरवात काल्याचे किर्तन संपल्यावर दुपारी १२ चे दरम्यान सुरू होते व संध्याकाळी ५ वाजता संपते. तदनंतर सर्व वारकरी शहरात ज्ञानेश्वरी ग्रंथाची भव्य टाळ मृदुंगाचे गजरात मिरवणूक काढतात. स्त्रिया डोक्यावर ज्ञानेश्वरी ग्रंथ व तुळशीचे वृंदावन घेउन सहभागी होतात. शहराला प्रदक्षिणा मारून मिरवणूक श्री.विठ्ठल मंदिरात परतते. कोणत्याही संस्थेची अथवा शासनाच्या मदती शिवाय हा सर्व सोहळा वारकरी स्वयंस्फुर्तिने पार पाडतात. या सोहळयाची तयारी जसे देणगी दारांकडून देणगी घेणे, स्वयंपाकासाठी लाकूडफाटा शेण्या गोळा करणे, किर्तनकारांना आमंत्रित करणे आदि कामे सुमारे २/३ मीहिने अगोदर पासून सुरू होते. अशा प्रकारे शहरात वर्ष भरात निरनिराळे ठिकाणी ३ कार्यक्रम बिनबोभाट पूर्ण होत असल्याचे श्री.चौधरी सांगतात.

विना सहकार नही उध्दार अशी नुसती पोपटपंची करणे पेक्षा या वाक्याची खरोखरीच प्रचिती घ्यावयाची असेल तर सावदे येथील हरिनाम सोहळयास उपस्थित राह्यलाच हवे.